SJIF 2014 = 3.189
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# विद्यार्थी अध्यापनात स्वयंमूल्यमापनाची भूमिका

**बापूसाहेब गणपत चौगुले** , Ph.D
अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे – ०९

**सारांश**

शिक्षण शिक्षणात विद्यार्थी अध्यापन हा प्रशिक्षणाचा गाभा आहे. विद्यार्थी अध्यापनामध्ये विद्यार्थी शिक्षक विविध प्रकारचे पाठ घेतात. विद्यार्थी शिक्षक एकत्रीकरण पाठ, अभिरुप पाठ, प्रतिमानाधिष्ठित पाठ, तंत्रज्ञानाधिष्ठित पाठ, सांघिक पाठ, मूल्यशिक्षण पाठ, पर्यावरण शिक्षण पाठ व स्वयंअध्ययन पाठ इ. प्रकारच्या पाठांचा सराव करतात. या सराव पाठांचे मूल्यमापन शिक्षक प्रशिक्षक करतात. त्यासाठी पदनिश्चयन श्रेणीचा वापर करतात. सराव पाठांना गुण देतात. तसेच चांगल्या बाबी व सुधारणा सांगतात. एवढ्या बाबींवर काही वेळा विद्यार्थी शिक्षकांचे समाधान होत नाही. तसेच मूल्यमापनातील व्यक्तीनिष्ठता टाळण्यासाठी स्वयंमूल्यमापनाची गरज आहे. विद्यार्थी शिक्षकाने स्वत:च्या अध्यापनचे स्वत: मूल्यमापन केल्यास स्वत:मध्ये असणाऱ्या क्षमता, विषयाचे ज्ञान, अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्य वापर, वर्गातील आंतरक्रिया, फलकलेखन, वर्गनियंत्रण, वेळेचे नियोजन या बाबींचे ज्ञान होते व स्वत:च्या उणिवा कळतात. त्यामुळे विद्यार्थी अध्यापन मूल्यमापनात वस्तुनिष्ठता आणता येते.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रास्ताविक


शिक्षक शिक्षण :– राष्ट्राचा व समाजाचा विकास हा शिक्षणाच्या स्वरुपावर अवलंबून असतो. शिक्षणाची प्रगती व प्रतिष्ठा शिक्षण देणाऱ्या शिक्षणांवर अवलंबून आहे. म्हणजेच राष्ट्रविकासाचे व समाजविकासाचे कार्य शिक्षकांवर अवलंबून आहे. शिक्षक हा राष्ट्राचा निर्माता आहे. सद्य:परिस्थितीत शिक्षकांचा सामाजिक

दर्जा सुधारण्यासाठी बदलत्या अभ्यासक्रमातील नवविचार प्रवाहानुसार स्वत:चे अध्यापन कार्य शिक्षकांना बदलणे गरजेचे आहे. शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण अध्यापन कार्य घडविण्यात शिक्षक शिक्षणाचा सिंहाचा वाटा आहे म्हणून शिक्षक शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्याची शिफारस विविध समित्यांनी केलेली आहे.

''शिक्षक शिक्षण म्हणजे औपचारिक व अनौपचारिक कृती आणि अनुभवांचा साठा जो व्यक्तीला अर्हता प्राप्त करण्यास, व्यावसायिक जबाबदारी ओळखण्यास मदत करतो.''

''शिक्षकी पेशास आवश्यक अध्यापन कौशल्य विकसित करणारे प्रशिक्षण म्हणजे शिक्षक प्रशिक्षण होय.''

शिक्षक शिक्षणातील अभ्यासक्रमाचे महत्वाचे तीन पैलू आहेत –



**विद्यार्थी अध्यापन –**

**संकल्पना –**

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ शिकविण्यासाठी सराव पाठ शाळेत जावे लागते. तेथे अध्यापन कार्य करीत असताना आलेल्या अनुभवात सुधारणा करणे आवश्यक असते. उत्तम शिक्षक होण्यासाठी होतकरु शिक्षकाला वर्गात यशस्वीपणे शिकविता आले पाहिजे. केवळ विषयाचे पुरेसे ज्ञान असून भागत नाही तर ते ज्ञान मूलांच्या मनावर परिणामकारक रितीने बिंबविता आले पाहिजे. त्यासाठी शिकविण्याचा पद्धतशीर सराव करावयास पाहिजे. शिक्षक शिक्षणात जसे तात्विक भागाला महत्त्व आहे तितकेच प्रत्यक्ष अध्यापनाला महत्त्व आहे. शिक्षक होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना दोन विषयाचे अध्यापन करावे लागते. यालाच विद्यार्थ्यांचे अध्यापन संबोधले जाते.

विद्यार्थी अध्यापन हा विद्यार्थी आणि अध्यापन शब्दांपासून तयार झाला आहे. विद्यार्थी या शब्दाचा अर्थ विद्या ग्रहण करणारा असा होतो. ज्याच्यामध्ये बुद्धी, व्यक्तिमत्त्व, पात्रता इत्यादी क्षमता असून त्यात समूहात शिक्षण दिले जाते. अध्यापन ही सामाजिक प्रक्रिया आहे. ती सामाजिक कार्याने प्रभावित होत असते. अध्यापनाद्वारे शैक्षणिक बदल घडवून आणता येतो.

तसेच अध्यापनात अध्यापन कौशल्य, शैक्षणिक समस्या व अध्यापन पद्धती यांचा समावेश होतो. यावरुन ''विद्यार्थी अध्यापन म्हणजे शिक्षक होण्यासाठी शिक्षक शिक्षण महाविद्यालयात शिक्षण घेत असताना शाळेत जाऊन अध्यापनाचा सराव करणे होय.''


**विद्यार्थी अध्यापनाची उद्दिष्टये –**

- विद्यार्थी शिक्षकांना विविध अध्यापनपद्धतीची माहिती करुन देणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये अपेक्षित दृष्टिकोन आणि अभिरुची विकसित करण्यासाठी कौशल्यांची माहिती देणे व विकास करणे.
- दृक श्राव्य साहित्य वापर करण्याच्या कौशल्यांचा विकास करणे.
- विद्यार्थी शिक्षकांचे आशय ज्ञान समृद्ध करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये शाळेतील विद्यार्थी व अध्यापन याविषयी आवड निर्माण करणे.
- वर्गातील मुलांचे अवधान व वर्गनियंत्रण याविषयी मार्गदर्शन करणे.
- स्वत:चे विचार स्वत:च्या भाषेत व्यक्त करण्याचे कौशल्य विकसित करणे.
- चांगला शिक्षक म्हणून स्वत:चे मूल्यांकन व चिकित्सा करण्याची सवय विकसित करणे.
- स्वत:च्या उदाहरणाने व वर्तनाने विद्यार्थ्यांवर नैतिकतेचा ठसा उमटविण्याची सवय विकसित करणे.
- विद्यालयातील समुदाय व शाळेप्रती इतर व्यवसायिक कर्तव्ये पूर्ण करण्यास प्रवृत्त करणे.

**विद्यार्थी अध्यापनाची वैशिष्ट्ये –**





**विद्यार्थी अध्यापन कार्यक्रम प्रक्रिया –**



हे सर्व करण्यापूर्वी कौशल्यांचा सराव, पाठ टाचण माहिती, सेतूपाठ अभिरुप पाठ, सांघिक अध्यापन पाठ, शैक्षणिक साहित्य निर्मिती, दिग्दर्शन पाठाचे निरीक्षण ह्या सर्व गोष्टी विद्यार्थी शिक्षकांकडून करुन घेतल्या जातात.

**विद्यार्थी अध्यापनाच्या मूल्यांकनाची सद्य:स्थिती :-**

बहुतांश शिक्षक शिक्षण महाविद्यालयात सराव अध्यापनाचे मूल्यमापन शिक्षक प्रशिक्षक करीत आहेत. सराव अध्यापन मूल्यमापनासाठी पदनिश्चयन श्रेणींचा वापर करतात. ही श्रेणी गुणात्मक व संख्यात्मक असते. या श्रेणीवरुन शिक्षक प्रशिक्षक गुण देतात. याशिवाय शिक्षक प्रशिक्षक विद्यार्थी अध्यापनातील चांगल्या बाबी व अध्यापनात आढळणाऱ्या उणिवा पाठ टाचणांवर लिहितात किंवा तोंडी सांगतात. हे मूल्यमापन करण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घेतात.




**स्वयंमूल्यमापन भूमिका –**

शिक्षक प्रशिक्षक विद्यार्थी अध्यापन झाल्यावर अध्यापनाला गुण देतात व अध्यापनात आढळणाऱ्या त्रुटी सांगतात. एवढ्या बाबींवर काही वेळा विद्यार्थ्यांचे समाधान होत नाही. अध्यापन चांगले झाले तरी काहीवेळा गुण कमी मिळतात तर काही अध्यापन मनासारखे झाले नाही तरी जास्त गुण मिळतात. कारण मूल्यमापनामध्ये व्यक्तिनिष्ठता येते ही व्यक्तीनिष्ठता टाळण्यासाठी स्वयंमूल्यमापनाची गरज आहे.

''विद्यार्थी अध्यापनाचे स्वयंमूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यांने स्वत:च्या अध्यापनाचे स्वत: मूल्यमापन करणे होय.''

विद्यार्थी शिक्षकाने स्वत:च्या अध्यापनचे स्वत: मूल्यमापन केल्यास स्वत:मध्ये असणाऱ्या क्षमता, विषयाचे ज्ञान, अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्य वापर, वर्गातील आंतरक्रिया, फलकलेखन, वर्गनियंत्रण, वेळेचे नियोजन या बाबींचे ज्ञान होते व स्वत:च्या उणिवा कळतात. त्यामुळे विद्यार्थी अध्यापन मूल्यमापनात वस्तुनिष्ठता आणता येते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे –**

- विद्यार्थी अध्यापन मूल्यमापनाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेणे.
- विद्यार्थी अध्यापन स्वयंमूल्यमापनासाठी साधनाची निर्मिती करणे.

- विद्यार्थी अध्यापन स्वयंमूल्यमापन साधनाची परिणामाकरकता अभ्यासणे.

**शोधनिबंधाचा व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शिक्षक शिक्षण महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या अभ्यास क्रमातील प्रात्यक्षिक भागापैकी सराव अध्यापनाच्या मूल्यमापनाचा विचार केलेला आहे.

तसेच विद्यार्थी अध्यापनासाठी स्वयंमूल्यमापनाचा वापर व त्याचे होणारे उपयोग या बाबींचा विचार केलेला आहे.

सदर शोधनिबंधासाठी अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे – ०९ येथील ५० विद्यार्थी शिक्षकांचा समावेश केलेला आहे.

**शोधनिबंधाची कार्यपद्धती –**

पुणे शहरातील प्रातिनिधिक स्वरुपात अध्यापक महाविद्यालयातील ५० विद्यार्थी शिक्षकांच्या सराव अध्यापनाचे स्वयं मूल्यमापन करण्यासाठी पडताळा – सूचीचा वापर करुन माहिती संकलित केलेली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करुन स्वयंमूल्यमापनांची भूमिका स्पष्ट केलेली आहे.



**स्वयंमूल्यमापनाची उपयुक्तता**

पडताळासूचीच्या साहाय्याने संकलित झालेल्या माहिती विश्लेषणावरुन आलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

- सर्वच विद्यार्थी शिक्षकांच्या मते स्वयंमूल्यमापनामध्ये स्वत:च्या क्षमता व त्रुटी समजतात.
- शिक्षक प्रशिक्षकांकडून राहिल्या गेलेल्या सर्व बाबींचे ज्ञान होते.
- स्वत:च्या उणिवा स्वत:ला समजल्यामुळे पुढील पाठात सुधारणा होते.
- विद्यार्थी अध्यापनाबाबत आत्मविश्वास स्वयंशिस्त विकसित होते.
- विषय ज्ञान समृद्ध व सखोल परिपूर्ण होण्यासाठी प्रेरणा मिळते.
- वेगवेगळ्या अध्यापनपद्धती वापरण्यासाठी मार्गदर्शन मिळते.
- पाठाची उद्दिष्टे साध्य झाल्याचे समजते त्यामुळे अध्यापनाबाबत समाधान मिळते.

- सर्व गोष्टींचा अध्यापनात समावेश करण्यासंदर्भात माहिती मिळते त्यामुळे अध्यापन प्रभावी व परिणामकारकत होण्यास मदत होते.
- अध्यापनांबाबत समाधान मिळाल्याने अध्ययन अध्यापनविषयी अभिरुची निर्माण होते.
- वेळेचे व्यवस्थापन करण्याची सवय लागते.
- विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची संधी, शंकाचे निरसन, विचार करण्यास प्रवृत्त, त्यांच्या कल्पनांचा स्वीकार याची जाणीव होऊन आंतरक्रिया प्रभावी होण्यास मदत होते.
- एकंदरित अध्यापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.
- मूल्यमापनात स्वत:चा समावेश असल्याने व्यावसायिक समाधान मिळते.
- स्वयंमूल्यमापन हे शिक्षक प्रशिक्षणातील सर्व पाठांसाठी उपयुक्त आहे.

**समारोप**

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये आतापर्यंत मूल्यमापनामध्ये विद्यार्थी शिक्षकांचा सहभाग घेतला जात नाही. परंतु विद्यार्थी अध्यापन हा प्रशिक्षणाचा गाभा असल्यामुळे विद्यार्थी सहभाग असणे गरजेचे आहे. सध्याच्या सराव अध्यापनात नाविन्यता आणण्यासाठी वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्यासाठी, विद्यार्थ्यांना व्यावसायिक समाधान मिळवून देण्यासाठी, स्वत:च्या उणिवा समजण्यासाठी व वर्तन सुधारणा घडवून आणण्यासाठी स्वयंमूल्यमापन स्वीकारणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

दुनाखे अरविंद (२००९) शिक्षक प्रशिक्षण, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

घोरमोडे कु. यु., घोरमोडे कला (२००९) शिक्षकांचे शिक्षण, नागपूर : विद्या प्रकाशन

पारसनीस न. रा. (२००५) शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे : नूतन प्रकाशन.

मोरे चंद्रकांत, भिलेगावकर सदानंद (२००८) शिक्षक शिक्षण, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

फडके वासंती (२००५) शिक्षक प्रशिक्षण, पुणे : ज्योत्स्ना प्रकाशन.

Bhaskara Rao (2004) Self Evaluation in Student Teaching, New Delhi : Discovery Publishing House.

Sharma R. A. (1989) Teacher Education, Meerut : International Publishing House.

Sharma Shashi Prabha (2003) Teacher Education Principles Theories and Practices, new Delhi : Kanishka Publishers.

Buch M. B. Editor (1991) Fourth Survey of Research in Education, New Delhi : N.C.E.R.T.